**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(दुपार)**

---

**दिनांक १७.०९.२०२६ गुरुवार**

**मा. न्यायालयातुन आरोपीला आजन्म कारावासाची शिक्षा :—**

दिनांक १६.०९.२०२६ रोजी मा. जिल्हा न्यायाधिश—२ तथा अति. सत्र न्यायाधिश, नागपुर श्री. एस.एच. ग्वालानी साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. १७६/२०२० मधील, पोलीस ठाणे हुडकेश्वर येथील अप. क्र. ४७८/२०१९ कलम ३०२,३२३,३४ भा.दं.वि. या गुन्ह्यातील आरोपी प्रसाद दशरथ रोकडे वय २९ वर्षे रा. प्लॉट क्र. १७४ बी, दुबे नगर, सुपर बाजारमागे, हुडकेश्वर, नागपूर यांचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, आरोपीला कलम ३०२ भा.दं.वि. अन्वये आजन्म सश्रम कारावासाची शिक्षा व २५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महीने अतिरीक्त सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. तसेच गुन्हयातील इतर आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

दिनांक २८.१०.२०१९ रोजी फिर्यादी रितीक धनराज डेंगे वय २० वर्ष रा. प्लॉट क्र. ७१, दत्त मंदीर समोर, नागपूर हा त्यांचा मित्र अभिजीत खरात व जितेंद्र वासुदेव बडे वय २९ वर्ष रा. प्लॉट क्र. ३६६, एक्सचेंज जिमचे बाजुला, हुडकेश्वर असे तिघे उदयनगर चौक, रिंग रोड येथे बोलत उभे असतांना, त्यांचेजवळच उभा असलेला आरोपी व त्याचे मित्र हे पोलीसांचे पेट्रोलींग वाहन आल्याचे पाहून पळून जात असता, फिर्यादीचा मित्र जितेंद्र बडे याने आरोपींना पाहून म्हटले की, 'क्यु भाग रहे हो, फट गयी क्या' असा टोमणा मारल्याचे कारणावरुन दिनांक २८.१०.२०१९ चे ००.१० वा. चे सुमारास आरोपी १) प्रसाद दशरथ रोकडे वय २९ वर्षे २) अनिमेष कविंद्र तागडे वय १९ वर्ष रा. वनराई नगर, ३) रोहन संदीप राऊत वय २३ वर्ष ४) सुमित गजानन दहाने वय २१ वर्ष रा. चिखली ले आऊट, शेषनगर, ५) अभिषेक सुरेश डोईफोडे वय २० वर्ष रा. अंबिकानगर, ६) अर्चित नरेश भावे वय २३ वर्ष रा. धनलक्ष्मी सोसायटी, पारडी, ७) दीपक दिलीप चौधरी वय २१ वर्ष रा. संजयगांधी नगर, नागपूर यांनी संगणमत करून फिर्यादी व मित्रांना हातबुक्कीने मारहाण केली. तसेच आरोपी क्र. १ याने जितेंद्र बडे याचे डावे हातावर, छातीवर चाकुसारखे शस्त्राने वार करुन त्यास जिवे ठार केले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपीविरूध्द पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे गुन्हा दाखल केला होता. आरोपींना दिनांक २९.१०.२०२९ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती कल्पना पांडे यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. रमेश रावलानी व जलतारे यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा किर्ती फुकट यांनी काम पाहिले.

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १६.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये १२ केसेसमध्ये १२ ईसमावर कारवाई करून एकुण ३३,८८५/—रू. चा मुद्देमाल जप्त

करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०५ केसेसमध्ये ०५ इसमांवर कारवाई करून एकुण ३९,०७०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १९८४ केसेस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये ३३ केसेस, ओव्हरस्पिडींग बाबत कलम ११२/१८३ मोवाका अन्वये ५४ केसेस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये १५ केसेस, प्रेशर हॉर्न कलम ११९/२ अन्वये ०७ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ९८ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये १९६ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये १९ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४ए मोवाका अन्वये ५५ केसेस, ड्रायव्हींग विदाऊन युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये २७ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ४८ केसेस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये १८ केसेस, विटाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४बी(१) मोवाका अन्वये २२ केसेस व इतर कलमांखाली असे एकुण २,६६४ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. १२,३९,४००/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

**दिनांक १६.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १७.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०८ इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे**.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**<u>२) एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हे दाखल.</u>**

दिनांक १६.०९.२०२६ चे २३.४५ ते १७.०९.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे वाडी हद्दीत, नागरिक गृहनिर्माण सोसायटी, सोनबा नगर, खडगाव रोड येथील एका घराचे अन्नपुर्णा अनाज भंडार नावाचे किरायाचे गोडावूनमध्ये पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तिथे हजर इसमास नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नांव अशोक गोपालराव कडु वय ६४ वर्षे रा. गाव पिंगावमाल, ता. जि. पांढुर्णा, मध्यप्रदेश असे सांगीतले. त्याचे गोडावूनची पंचासमक्ष पाहणी केली असता, तेथे विमल, राजश्री, पानपराग, केपी ब्लॅक, किंग, डबल ब्लॅक इत्यादी वेगवेगळ्या कंपनीचे शासन प्रतिबंधीत सुंगधित तंबाखुजन्य पदार्थ मिळून आले. आरोपीचे ताब्यातुन रोख ११,०००/— रु. व तंबाखुजन्य पदार्थ असा एकुण ३२,९५६/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता तंबाखुजन्य पदार्थ बेकायदेशीर विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीविरूध्द पोलीस ठाणे वाडी येथे कलम २२३,२७४,२७५ भान्यासं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे.

तसेच दिनांक १५.०९.२०२६ चे रात्री पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत बोखारा रोड, गोधनी रेल्वे पुलाजवळील गोलु पान सेंटर व कान्हा पान पॅलेस येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे हजर असलेले इसम अनुक्रमे दुर्गादास नारायणदास मलवे व योगेश ज्ञानेश्वर बोंद्रे यांचे ताब्यातुन शासन प्रतिबंधीत सुंगधित तंबाखुजन्य पदार्थ गुटखा तसेच खर्रा बनविण्याच्या मशिन इत्यादी मुद्देमाल मिळून आल्याने दोन्ही आरोपींचे ताब्यातुन एकुण ६२,२१०/— रु. कि. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही आरोपी तसेच गोलु पान सेंटरचा पळून गेलेला मालक प्रफुल्ल बाबारावजी भिष्णुरकर अशा तिंघाविरुध्द पोलीस ठाणे मानकापुर येथे कलम २२३,२७४,२७५ भान्यासं. सहकलम ५९ अन्नसुरक्षा मानके कायदा अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात सपोनि. भगवान कोळी, पोउपनि. उध्दव पोखरकर, पोहवा. विजय गिरी, नागेश्वर दासरवार, विजय वायदुडे, राहुल नागदेवे, आशिष गायधने, पोअं. अर्शद शेख, दिलीप बाजड, मनोज निमकर, राहुल गवई, दिनेश क्षीरसागर, चंद्रकांत यांनी केली.

**३) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पथकाची कामगिरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १६.०९.२०२६ चे १६.०५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ०३ चे अधिकारी व अंमलदार यांनी शासन प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थांचे अवैध विक्रीबाबत मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, अन्न सुरक्षा अधिकारी यांचेसह पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत, टेलिफोन एक्सचेंज चौक, मेट्रो स्टेशन जवळील मेसर्स भाऊ पान पॅलेस ॲन्ड कोल्ड्रींक्स सेंटर येथे पंचासमक्ष तपासणी केली असता तिने पानटपरीचालक नामे भाऊराव मनोहर खापेकर वय ४३ वर्षे रा. प्लॉट क्र. ०१, टेलिफोन एक्सचेंज चौक, मेट्रो स्टेशन जवळ, लकडगंज, नागपूर हा त्यांचे पानटपरीमध्ये शासनाने प्रतिबंधीत केलेला खर्रा व पानमसाला हे अन्नपदार्थ मानवी आरोग्यास हानिकारक व अत्यंत अपायकारक असल्याचे माहित असुनही जाणुनबुजून मानवी आरोग्यास धोका निर्माण करण्याचे हेतुने व स्वत:चा आर्थिक फायद्याकरीता विक्री करण्याचे हेतुने बाळगतांना मिळून आला. आरोपीचे ताब्यातुन १५.५ किलो खर्रा, वेगवेगळया वजनाच्या डायरेक्टर पानमसाला पुडया, पानबहार पानमसाला असा एकूण १७,३२२/— रु. चा शासनाने प्रतिबंधीत केलेला पानमसाला मुद्देमाल मिळुन आला. आरोपीविरूध्द फिर्यादी अन्न सुरक्षा अधिकारी अखिलेश दामोदर राऊत वय ४७ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे कलम १२३, २२३,२७४,२७५ भा.न्या.सं. सहकलम २६(२)(१),२६(२)(iv) अन्न सुरक्षा मानके अधिनीयम २००६ सहकलम ५९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह लकडगंज पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शानाखाली पोनि. अतुल मोहनकर व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**४) गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग व अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथक पोलीसांची कामगिरी :— देहव्यवसाय करवुन घेणाऱ्या तसेच एमडी पावडर विक्री करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १६.०९.२०२६ चे १८.५५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग व अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, सापळा रचून त्यांनी पोलीस ठाणे अजनी हद्दीत, हनुमान नगर, सार्वजनिक ग्रंथालय समोरील रोडवर पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी मंथन गोपाल थोटे वय २३ वर्षे रा. चंद्रमणी नगर, गली क्र. ०७, नागपुर हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता ग्राहकास देहव्यापाराकरीता पिडीत महीलेस कमी वेळात जास्त पैसे कमविण्याचे आमिष देवुन, तिला देहव्यावसाय करण्यास प्रवृत्त करतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन ०१ पिडीत महीलेची सुटका करण्यात आली. आरोपीचे अंगझडतीत त्याचे ताब्यातुन देहव्यवसायातील रोख १,५००/—रू., ०२ मोबाईल फोन, ॲक्टिवा गाडी तसेच एका झिपलॉक पन्नीमध्ये ३.६१० मिलीग्राम एमडी पावडर असा एकुण किंमती १,१८,६००/—रू. चा मुद्देमाल मिळून आल्याने जप्त करण्यात आला. आरोपीस एमडी पावडरबाबत विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहिजे आरोपी कुणाल यशवंत येडेकर रा. दुर्गा नगर, नागपूर याचेसह मदतीने आणल्याचे सांगितले. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे अजनी येथे कलम १४३(२) भा.न्या.सं., सहकलम ३,४,५,७ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनीयम सहकलम ८(क),२२(ब),२९

एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस अटक करून, मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव अजनी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल, मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. वैभव जाधव यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील, सपोनि. शिवाजी ननवरे, पोहवा. किशोर ठाकरे, प्रकाश माथनकर, सुनिल वाकडे, लक्ष्मण चौरे, मपोहवा लता गवई, पोअं. कुणाल बोडखे, नितीन वासने व मपोअं. पुनम शेंडे यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे सदरः— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १२.०९.२०२६ चे २१.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे जावई नामे शिवकुमार संतकुमार मिश्रा वय ३८ वर्ष रा. हनुमान मंदीर, भवानी चौक, सुरेंद्रगड, नागपूर हे त्यांचे ॲक्टिवा दुचाकी क्र. एम.एच. ३१ जीबी ७७७६ ने पोलीस ठाणे सदर हद्यीतील पागलखाना चौक ते पोलीस लाईन तलावाकडे जात असता राजनगर टि पॉईन्ट, राघव अपार्टमेंट समोर, छावनी येथे गंभीर जखमी अवस्थेत मिळून आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले होते. प्राप्त सुचनेवरुन पोलीस ठाणे सदर येथे अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली होती. अकस्मात मृत्युचे चौकशीमध्ये तसेच फिर्यादी यांनी दिलेल्या पुरवणी बयानामध्ये त्यांचे जावई हे घटनास्थळावरुन जात असता, मारुती सुजुकी कार क्र. एमएच ३१ एफई ८२१६ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे जावई यांचे दुचाकीला समोरुन धडक मारल्याने ते वाहनासह खाली पडल्याने डोक्याला मार लागुन गंभीर जखमी होऊन उपचारादरम्यान मरण पावले. त्यांचे मृत्युस कारचालक कारणीभुत आहे अशा फिर्यादी सौरभ अजय पाराशर वय ३६ वर्ष रा. प्लॉट क्र. १०, अंबादे ले आऊट, नारा, जरीपटका, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सदर येथे पोउपनि. निलेश शेंडकर यांनी कारचालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१, भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**

**सहा.पोलीस निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

नागपुर शहर.